
# कार्य-कर्तव्य

• प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील

## सेवा गौरवग्रंथ



Scanned with CamScanner

**डॉ.जगन्नाथ पाटील**

प्रमुख संपादक

**प्रा.डॉ.जे.एफ. पाटील**

संपादक मंडळ

**प्रा.सुभाष दगडे**

**प्रा.डॉ.एल.एन.घाटगे**

**प्रा.विनायक जाधव**

**प्रा.एन.एम.चोबे**

**प्रा.एस.के.आतार**

**प्रा.एस.के.लोखंडे**

**प्रा.सागर चव्हाण**

# कार्य-कर्तव्य

• प्राचार्य डॉ.जगन्नाथ पाटील

## सेवा गौरवग्रंथ

ISBN : 978-93-5737-246-6

संपादक : **प्रा.डॉ.जे.एफ्.पाटील**

प्रकाशक : **डॉ.विजयकुमार जगन्नाथ पाटील**
ओम प्लॉट नं.८, आदर्श कॉलनी,
विलासपूर, गोडोली, सातारा : ४१५००१.
भ्रमणध्वनी : ८९५६१२४२९०, ८१४९२३९१५३

**सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन**

प्रथमावृत्ती : **१८ सप्टेंबर, २०२२**

मुखपृष्ठ : **सौ.मीनाक्षी जगन्नाथ पाटील**
भ्रमणध्वनी : ७२४९३०९०३७

मुद्रक व अक्षरजुळणी : **श्री.जतिन अशोक शहा**
प्रिंट ओम ऑफसेट,
२६९/१२, दौलतनगर, सातारा : ४१५००२
भ्रमणध्वणी : ८८०५८७७९००

स्वागत मूल्य : **रुपये तीनशे फक्त**

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका - विभाग - २

## रोजगार, बेरोजगार : भारतीय अर्थव्यवस्था आणि बेरोजगारी या विषयावरील संदर्भ ग्रंथासाठीचा लेख संग्रह



| अ.क्र. | लेखकाचे नांव | नांव | पृष्ठ संख्या |
|---|---|---|---|
| १ | डॉ. संतोष दास्ताने | रोजगार-मूलभूत घटनात्मक अधिकार | ९३ |
| २ | प्राचार्य डॉ संजय धनवटे | भारतातील माहिती तंत्रज्ञान आणि बेरोजगारी व रोजगारीचे धोरण | ९९ |
| ३ | डॉ. लालासाहेब ना.घाटगे | भारतीय सेवाक्षेत्रातील बेरोजगारी : एक आव्हान | १०४ |
| ४ | डॉ.आर.वाय.माहोरे | रोजगार आणि केंद्र सरकारच्या योजना | ११२ |
| ५ | प्रो.डॉ.अनिलकुमार कृ.वावरे | भारतातील बेरोजगारी-रोजगार धोरण संदर्भातील तज्ञांचे अभ्यास व पाहणी अहवालाचे निष्कर्ष | ११८ |
| ६. | डॉ. अनिल पडोशी | बेरोजगारी, सरकार आणि अर्थिक सुधारणा | १२५ |
| ७. | प्रा. संजय ठिगळे | भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगाराचे बदलते स्वरूप | १२८ |
| ८. | डॉ. बंडू जयशिंग कदम | रोजगाराचे सैध्दांतिक विवेचन | १३३ |
| ९. | प्रा. डॉ आर.बी. भांडवलकर | संघटित क्षेत्रातील बेरोजगारी आणि रोजगार धोरण | १४० |
| १०. | डॉ. आर.एस. सोळुंके आणि डॉ. शिवाजी पाते | भारतातील कृषी क्षेत्र आणि महिला रोजगार | १४६ |
| ११. | प्रा. राजाराम कांबळे | भारतीय अर्थव्यवस्थेतील विषमतेचा प्रश्न, बेरोजगारी आणि रोजगारीचे धोरण | १५३ |
| १२. | प्रा. डॉ. शिवाजी भोसले आणि डॉ.जी.सी.खामकर | कृषी क्षेत्रातील बेरोजगारी व रोजगार धोरण | १५९ |
| १३. | प्रो. डॉ. अशोक खाचणे आणि डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे | भारतीय अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचा प्रश्न आणि रोजगाराचे धोरण | १६४ |
| १४. | डॉ. शैलजा कालिदास माने | असंघटित कामगार | १७२ |
| १५. | प्रा. राहुल बबनराव यादव | उद्योग क्षेत्रातील बेरोजगारी आणि रोजगाराचे धोरण | १७६ |
| १६. | प्रा. डॉ. संतोष फरांदे | भारतातील बेरोजगारी, रोजगार धोरण या संदर्भात राजकीय नेतृत्वाचे योगदान | १८० |
| १७. | डॉ. संतोष यादव | भारतातील बेरोजगारीचे वास्तव | १८५ |
| १८. | डॉ.एम.एस.देशमुख | भारतीय अर्थव्यवस्था, बेरोजगारी व तरुणाईचे भविष्य | १८८ |
| १९. | प्रा.सौ.एकता जाधव | महिला अद्योजकता विषयीचे धोरण | १९५ |
| २०. | प्रा. एम.जी.पाटील आणि डॉ.उल्हास माळकर | रोजगार व राज्य सरकारच्या योजना | १९९ |
| २१. | प्रा. डॉ. सुनिता तेलसिंगे | भारतातील महिला-बेरोजगारी व रोजगाराचे धोरण | २०३ |
| २२. | डॉ.सचिन कुंभार आणि श्री.निलेश कोळी | भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि रोजगार | २०९ |
| २३. | प्रा.सुभाष दिगंबर दगडे | भारतातील बेरोजगारीची समस्या आणि भारतीय संविधानातील तरतूदी | २१६ |
| २४. | प्राचार्य डॉ.अशोक करांडे | बेरोजगारी-शिक्षणक्षेत्रातील | २२४ |
| २५. | मा.मनोहर साळुंखे | शेतातील रोजगाराची वास्तवता | २२७ |
| २६. | मुलाखत | शेताच्या बांधावरून | २२९ |
| २७. | Dr.Anna K. Patil | Present Status of Employment in Indian Economy | २३३ |
| २८. | Jayamala Arjun Uthale | Poverty In Indian Economy : policies of poverty and unemployment in India | २३७ |
| २९. | Mrs.Priyanka Suyog Patil | Impact of Economic Reform on Employment | २४२ |



Scanned with CamScanner



# भारतीय अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचा प्रश्न आणि रोजगाराचे धोरण...





प्रो. डॉ. अशोक खाचणे, डॉ. विनोद आत्माराम नन्नवरे
डॉ. आण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना :**

बेरोजगारी ही भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठी समस्या आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हापासून ते आजतागायत भारतीय राज्यकर्ते स्वातंत्र्याची अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आणि भारताच्या राज्यकर्त्यांसमोर देशातील बेरोजगारी कशा पद्धतीने कमी करता येईल यासंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आपल्याला दिसून येते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते नियोजनाचा काळ संपला आणि त्यानंतर निती आयोगाची पायाभरणी झाल्यानंतर देखील पंचवार्षिक योजनेत देशातील बेरोजगारी दूर करण्यासाठी सातत्याने मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. वाढती लोकसंख्या आणि त्याप्रमाणात वाढणारा रोजगार त्यामुळे वाढत जाणारी बेकारी ही भारतीय राज्यकर्त्यां समोर सर्वात मोठी समस्या आहे. त्यामुळे सातत्याने देशातील राज्यकर्ते बेकारी दूर करण्यासाठी राज्यकर्त्यांनी रोजगार वाढीसाठी केलेले प्रयत्न आणि रोजगाराच्या संधी वाढत्या लोकसंख्येचे प्रमाणात उपलब्ध करू न देता वाढती लोकसंख्या आणि रोजगाराच्या अपूर्ण संधी यामुळेही रोजगार वाढविण्यासाठी सरकार अपयशी झाले आहे. त्यामुळेच वाढती बेरोजगारी आणि शासकीय धोरण या संदर्भातील अभ्यास करणे महत्वपूर्ण ठरते.

**रोजगार :** वैयक्तिक दृष्ट्या व्यक्तीला एखादा कामधंदा वा आर्थिक लाभाचा व्यवसाय मिळणे म्हणजे रोजगार होय.

राष्ट्राच्या दृष्टिकोनातून सक्षम व इच्छुक लोकांना त्या राष्ट्राची अर्थव्यवस्था किती प्रमाणात काम करण्याची संधी उपलब्ध करून देते याचे निदर्शक असणारी अवस्था म्हणजे पूर्ण वा एकूण रोजगार होय. अर्थव्यवस्थेच्या पातळीवर रोजगार इच्छुकांच्या संख्येपेक्षा रोजगार उपलब्धता कमी असेल, तर बेरोजगारी अथवा बेकारी निर्माण होते.

बेकारीच्या प्रश्नाने १९२९ च्या महामंदीच्या काळात एवढे भयंकर स्वरूप धारण केले की, पूर्ण रोजगार ही अर्थव्यवस्थेची प्रवृत्ती आहे, या सनातन सिद्धांताची नव्याने छाननी करणे व मुक्त अर्थव्यवस्थेच्या यंत्रणेत बेकारीची बीजे आहेत काय? या प्रश्नाचा गंभीर विचार करणे आवश्यक वाटू लागले. हे कार्य अर्थशास्त्रज्ञ केन्स यांनी परखडपणे केले. केन्स यांनी केलेली रोजगार मिमांसा सखोल व महत्व पूर्ण ठरली.



Scanned with CamScanner




केन्स यांनी जुन्या आर्थिक विचारांना जबरदस्त धक्का तर दिलाच पण राज्यसंस्थेने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करू नये. या पारंपारिक आर्थिक व पर्यायाने राजकीय तत्त्वज्ञानालाही हादरा दिला. केन्स यांनी असे दाखविले की, काही आर्थिक नियमांचे स्वरूप व नफ्याच्या प्रेरणेवर चालणाऱ्या मुक्त अर्थव्यवस्थेची कार्यपद्धतीच अशी आहे की, पूर्ण रोजगारच्या अवस्थेपर्यंत अर्थव्यवस्थेत समतोल साधणार नाही, हा निव्वळ भ्रम आहे आणि त्यामुळे सामान्यतः जाणीवपूर्वक प्रयत्न न केल्यास पूर्ण रोजगाराचा अभाव असणे हे अधिक संभवनीय आहे. पूर्ण रोजगार गाठावयाचा असेल, तर त्यासाठी खास उपाययोजना करणे आवश्यक असते. ही जबाबदारी देशातील मध्यवर्ती बँकेवर व राज्यसंस्थेवर पडते. याचाच अर्थ असा की, भांडवलशाही देशांत सरकारने आपले निर्हस्तक्षेप धोरण सोडले पाहिजे. केन्स यांची क्रांतिकारक रोजगार, व्याज आणि पैसा विषयक सर्वसामान्य सिद्धांत हे पुस्तक १९३६ सोली प्रसिद्ध झाले. व्याजाच्या दराचा रोजगाराशी फार संबंध आहे व म्हणून व्याजाच्या दरासंबंधी योग्य धोरण असल्यास पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो. हे धोरण आखण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेची आहे. मध्यवर्ती बँकेला व्याजाच्या दरावर परिणाम होईल, असे धोरण आखणे शक्यही आहे. कारण व्याज ही चलन विषयक घटना असून चलन पुरवठ्यावर ती अवलंबून असते.

''बेरोजगारी ही सुशिक्षित पण श्रीमंत लोकांसाठी चैनीची बाब असू शकते आहे. मात्र गरीब, अकुशल किंवा अंशिक कुशल लोकांसाठी तशी परिस्थिती नसते,'' -अर्थतज्ज्ञ राधिका कपूर.

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ९०% जनता असंघटित क्षेत्रात काम करते. लॉक डाऊनचा पहिला फटका याच असंघटित क्षेत्राला बसला. बांधकामे थांबली आणि शहरांतली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद करण्यात आली.

भारतातील बहुतांश मनुष्यबळ हे असुरक्षित असून त्यांच्या अस्तित्वाचाही प्रश्न आता निर्माण होण्याची शक्यता आहे, कारण अलीकडे काम करणाऱ्यांचं उत्पन्नही अत्यंत कमी आहे. एका सर्वेक्षणा नुसार पगारी नोकरी असलेले ४५% लोक हे महिन्याला ९,७५० रुपयांपेक्षा (१३०; :९६)कमी उत्पन्न असणारे आहेत. दिवसाला ३७५ रुपयांपेक्षाही ते कमी आहे. २०१९ मध्ये हे किमान वेतन प्रस्तावित करण्यात आले होते, मात्र नंतर ते रद्द झाले. चांगला विकासदर असूनही देशातील बेरोजगारीच्या या स्थितीमागचे एक प्रमुख कारण हे पूर्वीच्या कृषी आधारित अर्थव्यवस्थेकडून सेवा आधारित अर्थव्यवस्थेकडे होणारं स्थित्यंतर हे आहे. भारतासारख्या दुसऱ्या कोणत्याही देशांमध्ये विकास हा उत्पादनाच्या नव्हे तर सेवांच्या आधारावर झालेला आढळत नाही. भारताचा विकास हा सॉफ्टवेअर आणि आर्थिक क्षेत्रातील सेवांच्या कुशल मनुष्यबळाच्या जोरावर झालेला दिसून येतो.



Scanned with CamScanner

जागतिक बँकेच्या निरीक्षणानुसार, यंत्रांच्या वापरामुळे भविष्यात भारतातील रोजगार संधी ६९% नी कमी होणार आहेत. भारतातील बेरोजगारी वृद्धीस यंत्रवापर मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. शासनाने कामगार-प्रधान उद्योगांना उत्तेजन देणे आवश्यक आहे.

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी स्व-रोजगार आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना उत्तेजन देण्यास भर दिला आहे. या क्षेत्रांच्या वृद्धीसाठी त्यांनी अनेक प्रकारे वित्तीय साहाय्य केले आहे.

यामुळे रोजगारा संबंधी परिस्थिती सुधारण्यास मदत होणे शक्य आहे. श्रमिकांपैकी दोन तृतीयांश असंघटीत क्षेत्रात कार्यरत आहेत तर, केवळ १७% लोक संघटीत क्षेत्रात नियमित वेतनावर कार्यरत आहेत. पाचव्या राष्ट्रीय रोजगार-बेरोजगार संबंधी सर्वेक्षणातून असे लक्षात आले आहे की, केवळ ६०% लोक संपूर्ण वर्षभर कार्यरत राहिले तर, ३५% लोक केवळ ६-११ महिने रोजगार मिळत होता. हा अहवाल सप्टेंबर २०१६ मध्ये जाहीर करण्यात आला. रोजगाराचे चित्र अस्थिर आणि असंघटीत स्वरूपाचे आहे.

२०२० मध्ये बहुतांश देशामध्ये बेरोजगारी वाढल्याचे पाहायला मिळाले. पण भारताचा बेरोजगारी वाढीचा दर हा बांगलादेश (५.३%), मेक्सिको (४.७%) आणि व्हिएतनाम (२.३%) या नव्यानं उदयास येणाऱ्या अर्थव्यवस्थांपेक्षाही जास्त होता.

**भारताचा बेरोजगारीचा दर :**

वरील आलेखात भारतातील बेरोजगारीचा दर दर्शविला आहे. आणि तो जवळपास २००९ पासून ते २०१३ या पाच वर्षाचा सरासरी वार्षिक वृद्धी दर हा साधारणपणे ५.६४८ इतका दिसून येतो. याकालावधीत देशातील बेरोजगारीच्या दर स्थिर राहिलेलेला दिसतो. त्यानंतर मात्र मध्ये सातत्याने वाढ झालेली दिसून येते. त्यानंतर मात्र २०१४ ते २०१८ या पाच वर्षाच्या कालावधीत सुरुवातीच्या पाच वर्षाच्या तुलनेत बेरोजगारीच्या दरात घट झालेली दिसते कारण म्हणजे शासनाने ज्या काही अनेक रोजगार वाढीसाठी योजना आणि धोरणे आखली होती. त्यामुळे २०१४ पासून २०१८ याकालावधीत रोजगार विस्तार धोरण, व्यापक स्तरावरील सरकारी धोरण, बहु-आयामी रोजगार विषयक धोरणे, कौशल्य प्रशिक्षण आणि नोकऱ्यांमधून रोजगार निर्मिती, स्वयं-सहाय्यता कार्यक्रम, मिशन मूल्यांकन आणि नवीन उपक्रम यासारख्या अनेकविध धोरणांचे फलित हे आपल्याला रोजगार वाढीच्या संदर्भात असल्याचे दिसते. या कालावधीत सरासरी रोजगार पातळी २००९ ते २०१३ या पाच वर्षाच्या कालावधीच्या तुलनेत २०१४ ते २०१८ या पाच वर्षाच्या कालावधीत सरासरी रोजगार ५.४८२ इतका असल्याचे दिसते याचाच अर्थ असा की या कालावधीत देशात रोजगार पातळीमध्ये वाढ झालेली आहे. त्यानंतर



Scanned with CamScanner




मात्र जागतिक महामारीचा कोविड - १९ चे परिणाम हे आपल्याला सर्व जगावर ज्यापद्धतीने झाले तसेच परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले दिसून येतात. या कालावधीत प्रामुख्याने कोविड १९ च्या पहिल्या अवस्थेत मध्ये अनेकांना शहरी कामगारांना आपल्या गावाकडे स्थलांतर करावे लागले. अनेक उद्योजकांनी आपले व्यवसातील कामगार कपात करायला सुरुवात केली. परिणामी सर्व व्यवसाय कारखानदारी, रोजगार, शेती, व्यापार बंद झालेत. अनेक श्रमिकांना स्थलांतर करतांना आपला जीव गमवावा लागल्याचे दिसते. आणि म्हणून या सगळ्यांचा परिणाम अर्थव्यवस्थेवर खुप मोठा परिणाम झाला. कोविड १९ च्या दुसऱ्या लाटेत देशात बेरोजगारी वाढू नये आणि उपासमारी मुळे लोकांचे बळी जाऊ नये म्हणून सार्वजनिक वितरण प्रणाली मार्फत देशातील सर्वच लोकांना अन्नधान्याचे मोफत वितरण करण्यास सुरुवात केली त्याबरोबरच रोजगार हमी योजना आणि अशा अनेक योजना भारत सरकारने दुसऱ्या लाटेत असंख्य सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे दुसऱ्या लाटेत जगात सर्वत्र मानवी आणि आर्थिक हानी जरी झालेली असली तरी भारतात यावर मात करण्यासाठी अनेकविध सुविधा भारत सरकारने देशवासियांना उपलब्ध दिल्यात. त्यामुळे २०१९ ते २०२० या दोन वर्षाच्या कालावधीत जरी जगात बेरोजगारीचा दर मोठ्या प्रमाणात वाढलेला असला तरी भारतात बेरोजगारीचे प्रमाण तुलालेनेने खुप कमी होते त्याला कारण असे की, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत व त्यानंतर अनेक सुधारणा भारतात झालेल्या दिसतात.

यावरून असे दिसते की, वरील आलेखाचे तीन टप्पे आपल्याला पहावयास मिळतात त्यात २००९ २०१३ या पहिल्या टप्प्यात असणारा बेरोजगारीचा दर हा स्थिर असून तो दुसऱ्या टप्प्यात (२०१४ ते २०१९) कमी झालेला दिसतो तर तिसऱ्या टप्प्यात म्हणजे २०१९ ते २०२० या लॉकडाऊनच्या काळात बेरोजगारीचा दर अतिउच्च पातळीला पोहोचलेला दिसून येतो. मात्र २०२१ पासून ते आजपर्यंत घसरून पुन्हा पूर्व पदावर आलेला आहे.

**रोजगार विस्तार धोरण -**

विद्यमान सरकारने रोजगाराला चालना मिळण्याच्या दिशेने काही सुधारणा हाती घेतल्या आहेत. उदा. रस्ते बांधणीवर भर (श्रम विषयक काम), मुद्रा योजना, (लहान उद्योजकांना कर्ज पुरवठ्याची सोय) आणि नवेकामगार घेणाऱ्या मालकाला वेतन अनुदान, (भविष्य निर्वाह निधीसाठी मालकाचे योगदान सरकार भरणार) बांधकाम क्षेत्रातल्या सकल राष्ट्रीय उत्पादन वृद्धीची, वित्तीय वर्ष १८ मधल्या वाढीत मोठी भूमिका आहे. वित्तीय वर्ष २०१८ मध्ये बांधकाम क्षेत्रात सकल राष्ट्रीय उत्पादनात झालेली ५.८ टक्के वृद्धी ही गेल्या सहा वर्षातील सर्वात मोठी वाढ आहे. वित्तीय वर्ष १८ मध्ये बांधकामाला मिळालेली गती ही गेल्या २० वर्षात मिळालेली सर्वोच्च होती. २०१८ या वित्तीय वर्षात बांधकाम क्षेत्राने १.७ ते ३ दशलक्ष रोजगार



Scanned with CamScanner





उपलब्ध केल्याचे अनुमान आहे.

**व्यापक स्तरावील सरकारी धोरण -**

सन २००९ चे कौशल्य विकास धोरण अभ्यासल्यानंतर उद्योजकते वर लक्ष्य केंद्रीत करणारे नवीन धोरण सन २०१५ मध्ये आखण्यात आले. कौशल्य विकास आणि उद्योजकता धोरण २०१५ हे धोरण, मोठ्या प्रमाणावर कौशल्यावर आधारीत तसेच संशोधनावर आधारीत उद्योजकतेचे वातावरण देणारे, ज्याद्वारे संपत्ती आणि रोजगार निर्मिती होऊन देशातील सर्व नागरीकांच्या शाश्वत उपजिविके साठी नवीदृष्टी देणारे असे आखण्यात आले. याधोरणात मुख्यबदल करुन अप्रेंटीसशिप कायदा १९६१ यामध्ये उद्योगांचा सहभाग वाढविण्यासाठी आणि शिकाऊ उमेदवारांच्या कक्षा वाढविण्यासाठी उद्योगांकडून प्राथमिक माहिती घेण्यात येऊन यामध्ये सन २०१४ ला सुधारणा करण्यात आली. सन २०१५ च्या राष्ट्रीय कौशल्य धोरणामध्ये शिकाऊ उमेदवारांना कामाच्या ठिकाणी कार्यानुभव देण्याचे धोरण कौशल्य विकास प्रयत्नांचे  घटक बनविण्याचे  ठरले.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीनुसार विकास दरातील वाढ रोजगारसंधीत वृद्धी असल्याचे द्योतक आहे. जर असे नसेल तर प्राप्त आकडेवारीच्या सर्वेक्षणांत गल्लत असण्याची शक्यता आहे. अचूक माहितीवरून योग्य विश्लेषण मांडता येते. शेतीसारख्या व्यवसायात सर्वच नव्या रोजगारार्थीला शिरकाव करणे शक्य नाही. शेतीचे व्यापारीकरण व शेतीपूरक उद्योगांतूनही फारशा प्रमाणात समाधानकारक रोजगार मिळेल असे नाही. म्हणूनच सरकार व्यापक स्तरावील सरकारी धोरणात पुढील धोरणांचा समावेश केला.

**(अ) - बहु-आयामी रोजगार धोरणे -**

सर्वसमावेशक दृष्टीकोनाद्वारे शहरी गरिबी कमी करणे आणि रोजगाराला बढती देण्यावर लक्ष केंद्रीत करणे हे या मिशनचे ध्येय आहे. सामाजिक जागृती आणि संस्थात्मक विकास या मिशन मधील घटकांमुळे तीनस्तरांमध्ये समाजाची बांधणी केली जाते ते तीन स्तर असे - स्वयं सहाय्यता गट (एस.एच.जी.) निर्माण करणे, विभाग पातळीवर किंवा झोपडपट्टी पातळीवर महासंघ निर्माण करणे आणि शहर पातळीवर महासंघ निर्माण करणे.

**(ब)-कौशल्य प्रशिक्षण आणि नोकऱ्यांमधून रोजगार निर्मिती-**

इ.एस.टी.पी.घटकामुळे शहरातल्या गरीब उमेदवाराची रोजगार क्षमता वाढते. रोजगार केंद्रीत, परिणामकारक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारा नोकऱ्या आणि स्वयंरोजगार निर्मितीवर भर देण्यात येतो. हे उपक्रम मागणीला अनुसरूनच तयार होतील याची खातरजमा करण्यासाठी सध्याच्या कौशल्यांमध्ये किती तफावत आहे त्याचा अभ्यास करण्यात आला आहे. विविध चाळण्या लावनू त्यानंतर



Scanned with CamScanner




उमेदवार निवडण्यात येतात आणि त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. यामळे उदयोगांच्या मागणीनुसार आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षेनुसार उमेदवारांना प्रशिक्षणाचा विषय निवडता येतो.

**(क) - स्वयं सहाय्यता कार्यक्रम -**

वैयक्तिक आणि गटांना सूक्ष्म उद्योग उभारण्यासाठी 'स्वयं सहाय्यता' या मिशनमधल्या घटकाचा उपयोग होतो. यासाठी ७ टक्के व्याजदराने बँकेची कर्जसुविधा उपलब्ध करून दिली जाते. यामध्ये तीन प्रकारची कर्ज सवलतीमध्ये उपलब्ध आहेत - २ लाख रूपयांपर्यंत वैयक्तीक कर्ज मिळते तर, स्वयं सहाय्यता गटासाठी १० लाख रूपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होते. यामध्ये गटाकडे ज्या प्रमाणात निधी उपलब्ध असेल त्यानुसार १:४ या प्रमाणात (रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनसार) कर्ज उपलब्ध होते. एस. इ. पी घटकाच्या अंतर्गत कर्ज मिळण्यासाठी जे अर्ज येतात त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी बँकेचे आणि शहर स्थानिक मंडळांचे प्रतिनिधी मिळून काम करतात.

**(ड) - मिशन मूल्यांकन आणि नवीन उपक्रम -**

मध्यावधी मूल्यांकन केल्यावर जी तफावत आढळून आली त्यावर उपाय म्हणनू डी.ए.वाय्-एन्.यू.एल.एम. अंतर्गत मोठा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये व्याज सवलतीसाठी वेब पोर्टल उभारले जाईल, जेणे करून व्याज सवलत थेट लाभार्थींच्या कर्ज खात्यात जमा होईल. यापूर्वीच योजनेत सामील होण्यासाठी सवलतीच्या कर्ज दरात उपलब्ध असलेले मुद्रा कर्जसुद्धा डी.ए.वाय्-एन्.यू.एल.एम. या पात्र ठरले आहे. यामळे कर्ज योजनांचे एकीकरण होऊ शकेल.

श्रम सुविधा पोर्टल माननीय पंतप्रधानांनी १६ ऑक्टोबर २०१४ रोजी श्रम सुविधा पोर्टल सुरू केले. कामगार कायद्याला अनुरूप असे सर्व काही एकाच ठिकाणी मिळू शकणारे हे पोर्टल आहे.

कृषीक्षेत्राने गेल्या दोन वर्षात उत्कृष्ट वाढ अनुभवली आहे, देशाच्या एकूण मूल्यवर्धनामध्ये (जी.व्ही.ए) १८.८% (२०२१-२२), २०२०-२१ मध्ये ३.६% आणि २०२१-२२ मध्ये ३.९% वाढ नोंदवली आहे.

स्टार्ट-अप उद्योगांना पोषक वातावरण मिळवून देण्यामध्ये अमेरिका आणि चीन नंतर म्हणजे जगात तिसरा क्रमांक भारताचा लागतो. नवीन स्टार्ट-अप उद्योगांची संख्या २०२१-२२ मध्ये १४००० च्या पुढे गेली तर २०१६-१७ मध्ये हीच संख्या ७३३ होती.

भारतातील ४४ स्टार्ट-अप उद्योग २०२१ मध्ये 'युनिकॉर्न' दर्जापर्यंत पोहोचल्याने देशातील युनिकॉर्न उद्योगांची एकूण संख्या ८३ झाली. यापैकी बहुतांश उद्योग हे सेवा क्षेत्रातील आहेत.



Scanned with CamScanner





अर्थव्यवस्थेत सुधारणा होत चालल्याने २०२०-२१ च्या शेवटच्या तिमाहीत रोजगार निर्देशांक उसळून कोरोनापूर्व स्तारापर्यंत पोहोचले. मार्च २०२१ च्या त्रैमासिक PFLS म्हणजे नियतकालीन श्रम शक्ती सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, कोरोना महामारीमुळे बाधित झालेला शहरी क्षेत्रातील रोजगार, पूर्वपदावर पोहोचत असून आता कोरोनापूर्व काळातील स्तराजवळ पोहोचला आहे.

EPFO म्हणजेच कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संस्थेने जारी केलेल्या आकडेवारी नुसार कोविडच्या दुसऱ्या लाटेच्या काळात नोकऱ्यांना औपचारिक स्वरूप येण्याची प्रक्रिया चालू राहिली. कोरोना महामारीचा या प्रक्रियेवर झालेला परिणाम पहिल्या लाटेच्या तुलनेत दुसऱ्या लाटेच्या वेळी बराच सौम्य होता.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) यासाठी अधिक निधी उपलब्ध करून दिल्याने ग्रामीण भागातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांना कोरोना काळात अधिक संरक्षण मिळू शकले आहे.

**निष्कर्ष-**

१.शेती आणि शेतीतून निर्माण होणारा रोजगार यात व्यावसायिकता प्रस्थापित करण्यासाठी शासन स्तरावर अनेक धोरणे आखली जात आहेत.

२. भारतातील बेरोजगारीचे प्रमुख कारण कृषी आधारित अर्थव्यवस्थेचे सेवा आधारित अर्थव्यवस्थेकडे होणारं स्थित्यंतर असल्याचे दिसून येते आणि यामुळे शासनाने भारतीय शेतीच्या व्यापारीकरणावर भर दिला आहे.

३. भारतातील लोकांना उत्तम दर्जाचे प्रशिक्षण विषयक रोजगाराचे कार्यक्रम तयार करून रोजगारातून व्यावसायिक तयार घडत आहेत.

४. भारतात कौशल्याधारित शिक्षणाचा अभाव, तसेच औद्योगिक धोरण आणि राष्ट्रीय रोजगार धोरणाची अंमलबजावणी होत नाही. म्हणून शिक्षणातून कौशल्य प्रदान करून रोजगार निर्मिती केली जात आहे.

५. देशांतर्गत स्पर्धेला चालना मिळाली पाहिजे त्यासाठी स्टार्ट-अप उद्योगांना मोठ्या प्रमाणात उत्तेजन दिले जात आहे. परिणामी उद्योग क्षेत्राकडून सेवाक्षेत्राकडे वाढ होताना दिसत आहे.

६. परकीय स्पर्धेपासून देशातील उद्योगांचे संरक्षण करण्यात शासकिय धोरण अपूर्ण ठरत असल्याकारणाने स्टार्ट-अप उद्योगांना प्रोत्साहनदिले जात आहे.

७. भारत सरकारने निर्यात वाढीस व आयात पर्यायीकरण धोरणात योग्य असे बदल केल्यामुळे भारताचा आयात निर्यात यामध्ये अभूतपूर्व असे बदल पहावयास मिळत आहेत.



Scanned with CamScanner

८. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नोकऱ्या कमी होतील असे चित्र निर्माण होण्यापेक्षा, तंत्रज्ञान वापरल्यामुळे नवीन प्रकारच्या रोजगाराच्या संधी कशा निर्माण होतील अशी धोरणे आखण्यात राज्यकर्त प्रयत्न करत असल्यामुळे प्रशिक्षित कामगार तयार होत आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. विकास समर्पित मासिक योजना, अंक २, सप्टेंबर २०१८
2. https://vishwakosh.marathi.gov.in/31602/
3. https://www.bbc.com/marathi/india-59922616
4. https://www.bbc.com/marathi/india-52597920
5. https://www.bbc.com/marathi/india-59922616
6. https://www.orfonline.org/marathi/increasing unemployment-a-major-challenge-121822/
7. https://www.bbc.com/marathi/podcasts/p09431p4
8. https://www.bbc.com/marathi/india-52597920


□ □ □ □